प्रेस नोट

**भूगावमधील अनधिकृत होर्डिंगवर 'पीएमआरडीए'चा हातोडा;**

**मुळशी तालुक्यातील कारवाईने अवै**ध होर्डिंगधारकांचे धाबे दणाणले!

पुणे : पुणे महानगर प्रदेश हद्दीतील अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंग्जविरोधात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) आता अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून आज, दि. १८ मे रोजी मुळशी तालुक्यातील भूगाव येथील एका मोठ्या अनधिकृत होर्डिंगवर अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या पथकाने निष्कासनाची धडक कारवाई केली. 'पीएमआरडीए'ने सुरू केलेल्या या जोरदार कारवाईमुळे पुणे महानगर परिसरातील अवैध होर्डिंगधारकांचे धाबे दणाणले आहेत.

मौजे भूगाव (ता. मुळशी) येथील गट नं. ४४ मध्ये हे अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आले होते. अभिजीत मालुसरे यांच्या मालकीच्या जागेत 'ओंकार ॲडव्हर्टायझिंग' या होर्डिंगधारकाने कोणतीही रितसर परवानगी न घेता हे होर्डिंग लावले होते. हे होर्डिंग धोकादायक आणि अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर 'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या पथकाने आज तातडीने कारवाई करत ते जमीनदोस्त केले.

ही संपूर्ण कारवाई महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अनधिकृत बांधकाम विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिंमत खराडे यांच्या थेट नेतृत्वात तहसीलदार आशा होळकर व रवींद्र रांजणे यांच्या विशेष पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवली.

अनधिकृत व धोकादायक होर्डिंग्जमुळे नागरिकांच्या जीवाला असणारा धोका लक्षात घेता, 'पीएमआरडीए'ने आपली मोहीम अधिक तीव्र केली आहे. या कारवाईबाबत बोलताना अनधिकृत बांधकाम विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिंमत खराडे यांनी संबंधित व्यावसायिकांना कडक शब्दांत सुनावले, "पुणे महानगर प्रदेश हद्दीतील सर्व होर्डिंगधारकांनी प्रशासकीय नियमांचे पालन करून रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. ज्या होर्डिंगधारकांनी अद्याप परवानगी घेतलेली नाही किंवा ज्यांची होर्डिंग्ज धोकादायक स्थितीत आहेत, त्यांनी ती स्वतःहून हटवावीत. अन्यथा, प्रशासनातर्फे कोणतीही गय न करता अशीच कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल," असा इशारा खराडे यांनी दिला आहे.

यापुढेदेखील ही मोहीम तीव्र केली जाणार असून, मुळशी आणि आसपासच्या परिसरात विनापरवाना होर्डिंग उभारणाऱ्यांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

----

पुरुषोत्तम सांगळे

माहिती व जनसंपर्क अधिकारी,

पीएमआरडीए, पुणे